# पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय

## अहवाल -२०२२-२३

## अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये अर्थशास्त्र विभागात द्वितीय वर्ष कला या वर्गात एकूण २७ विद्यार्थी प्रवेशित असून तृतीय वर्ष कला या वर्गात २० विद्यार्थी प्रवेशीत आहेत पदव्युत्तर विभागात एम ए भाग १ आणि भाग २ मिळून एकूण १८ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयाची सखोल व अद्ययावत माहिती मिळावी यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम विभागाच्या वतीने राबविले जातात.

१) जागतिक लोकसंख्या दिन - दिनांक ११ जुलै २०२२ रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला . त्यानिमित्ताने वाढत्या लोकसंख्येचे परिणाम या विषयावर डॉ. आशा खिलारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ. आदिनाथ पाठक यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते .

२) वित्तीय साक्षरता - दिनांक २१ सप्टेंबर २०२२ रोजी साक्षरता दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आधुनिक काळात वित्तीय साक्षरता हि अत्यंत महत्वाची असून विद्यार्थाना त्याची माहिती आणि महत्व या विषयाची सखोल ओळख होण्यासाठी प्रा. दिलीप मुंजाळयांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. दिलीप मुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना वित्तीय साक्षरतेचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले .

९३

अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ. अंकुश काळे यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली . प्रा. पवन नरवडे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते .

३) इंटर्नशिप मार्गदर्शन- तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांना बँकिंग या विषयाकरिता इंटर्नशिप ही सक्तीची असून प्रत्येक विद्यार्थ्याला त्या बाबतची सखोल माहिती मिळावी यासाठी शाहू महाविद्यालयाच्या प्रा. नेहा नलावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी ६२ विद्यार्थी उपस्थित होते . या व्याख्यानाचे आयोजन बँकिंग विषयाचे प्रा .उकिर्डे एल जी. आणि अंकुश काळे यांनी केले

४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन - १५ नोव्हेंबर २०२२ रोजी अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग ,एमपीएससी ,सेट नेट इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रा. पवन नरवडे ,प्रा. अंकुश काळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.प्रा. पवन नरवडे यांनी विद्यार्थांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांच्या बाबतची माहिती आणि त्यांची पूर्वतयारी याबाबतचे मार्गदर्शन केले. प्रा.अंकुश काळे यांनी विद्यार्थ्यांना प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेल्या सेट व नेट परीक्षांची माहिती दिली .

५) संशोधन मार्गदर्शन - १२ जानेवारी द्वितीय वर्ष कला ,आणि एम ए अर्थशास्त्र भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती हा विषय अभ्यासासाठी असून त्या विषयाचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी प्रा.प्रविण पोतदार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.विद्यार्थ्यांना संशोधनाची ओळख व आवड निर्माण व्हावी याकरिता हे व्याख्यान उपयुक्त ठरले.

६) राष्ट्रीय चर्चासत्र - अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १६-१७ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत दोन दिवशीय राष्ट्रीय स्तरावरील NATIONAL EDUCATION POLICY 2020 INDIA या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले .या चर्चासत्रात पुणे जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील अर्थशास्त्र विषयाचे ३५ प्राध्यापक सहभागी झाले होते.

वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. जी पी सातव यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ.मेघना भोसले व सहकारी प्राध्यापक डॉ.आदिनाथ पाठक,डॉअंकुश काळे ,प्रा उकिर्डे एल जी ,प्रा पवन नरवडे यांनी केले .

Bharat

**Head**
**Department of Economics**
**Mamasaheb Mohol College,**
**Paud Road, Pune-38.**

प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे - ३८.